**प्रतिवादी यांचा साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री डी.टी.पाटील यांच्यामार्फत सुरु.**

बापुसाहेब प्रतिवादी क्र. १ हे माझे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी शिक्षक आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३२४ ही माझी व प्रतिवादी क्र. १ यांची वडीलोपार्जीत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमीनीच्या वाटण्या झाल्या नाहीत. वाटणी ही घरगुती सोयीसाठी केली होती.

प्रश्न- सर्व जमीन मोठे भाऊ पहातात.

उ. ज्याचे ते जमीन पहातात.

गट क्र. ३२४ च्या पुर्वेला शिवाजी पाटील, पश्चीमेला नदी, दक्षीणेला शिवाजी पाटील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३२४ मधील माझ्या जमीनीच्या उत्तरेला गट क्र. ३३७ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३३७ चे मालक प्रदीप भगवानराव मोठे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे जमीनीच्या व वादीच्या जमीनीच्या मध्ये पुर्व पश्चीम बांध आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, नदी आहे. हे म्हणणे खरे आहे की, नदी ही गट क्र. ३३७ मधून ३२४ मध्ये येते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३२४ च्या उत्तरेला गट क्र. ३३७ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३७ मध्ये नदीच्या पश्चीमेला आम्ही वाद केला आहे.

साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी परभणी येथे रहातो.

प्रश्न- वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये काय वाद आहे हे तुम्हाला माहीत नाही.

उ. मला फक्त दावा आहे हे माहीत आहे.

माझी गट क्र. ३२४ व ३३७ मधील हद्द कायम करायला माझी कोणतीही हरकत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, वादीने त्यांची जमीन मोजून घ्यावी. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३२४ व ३३७ मध्ये हद्दीबाबत मला कांहीही माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.07.27 11:40:12 +0530

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. २७/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर